**अतितात्काळ / कालमर्यादा / न्यायालयीन प्राथम्य**

**क्र.पोमसं/५/१०/पोउनि खाससे-२०१०(भालेराव व इतर)/८६/१२-१७**

पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- २६ / ०४ / २०१७

**विषय :-** जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याबाबत.
मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपिटापुढे दाखल केलेला मूळ अर्ज क्र.३२१/२०१५ (श्री. धिरज लक्ष्मण भालेराव, व इतर २२०)

* * * * *

सदरहू प्रकरणी कळविण्यात येते की, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपिठाने मूळ अर्ज क्र.३२१/२०१५ (श्री. धिरज लक्ष्मण भालेराव, व इतर २२०) ची सुनावणी दि.१५.०६.२०१७ रोजी ठेवलेली आहे.

२. सदर सुनावणीच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.१२.०४.२०१७ ची जाहीर नोटीस महाराष्ट्र पोलीस दलाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदरची नोटीस उपरोक्त नमूद संकेतस्थळावर FLASH मध्ये NOTICE in O.A.No.321/2015 (Mr.D.L.Bhalerao & ors.220) या शिर्षाखाली प्रसिध्द करण्यात आली आहे.

( राजकुमार व्हटकर )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / वाहतूक, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, मुंबई / लोहमार्ग, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक .
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर /विशेष सुरक्षा विभाग, मुंबई /फोर्स वन, मुंबई.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग/ कारागृह सह).
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे (धुळे वगळून).

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षकांनी सोबत जोडलेली जाहीर नोटीस www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH मध्ये NOTICE in O.A.No.321/2015 (Mr.D.L.Bhalerao & ors.220) या शिर्षाखाली प्रसिध्द करुन, दि.१५.०६.२०१७ पर्यंत ठेवावी.

प्रत माहितीकरिता,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १४-अ.

No. MAT/MUM/JUD/1528/17
12 APR 2017

मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर
मुळ अर्ज क्रमांक ३२१ / २०१५.

श्री. धिरज लक्ष्मण भालेराव व २२० इतर ....... अर्जदार
विरुध्द
पोलीस महासंचालक (म.रा.), मुंबई व ०९ इतर ....... प्रतिवादी

वरील सर्व अर्जदारांना मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर वरील नमूद मुळ अर्ज दाखल करुन मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पारीत केलेला आदेश दिनांक ०३/१२/२०१४ च्या आदेशास आव्हान दिलेले आहे. या आदेशानुसार वरील मुळ अर्जामधील पोलीस उपनिरिक्षक या पदांवर सत्र क्रं.१०९ (खात्याअंतर्गत सरळसेवा) मधील प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरिक्षक म्हणून नेमणूक झालेल्या काही अर्जदारांना पोलीस महासंचालकांनी असे कळविले आहे की, त्यांनी पोलीस उपनिरिक्षक या संवर्गात १०८ बॅचेसच्या पोलीस उपनिरिक्षक (सरळ सेवा माध्यम), यांचेवर मागणी केलेली सेवा ज्येष्ठता देता येणार नाही. सदर मुळ अर्जात एकूण सात ज्या पोलीस उपनिरिक्षकांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण यांचे समोर वरील नमूद अर्ज दाखल करुन वरील ज्येष्ठता यादीत वरील जागा मिळवली आहे, त्यांना पक्षकार केले आहे. इतर ज्या पोलीस उपनिरिक्षकांना मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर येवून दिनांक ३/१२/२०१४ रोजीच्या आदेशाच्या संदर्भात त्यांनी पुढील तारखेस म्हणजे दिनांक १५/०६/२०१७ रोजी सुनावणीस प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत उपस्थित राहून आपली बाजू मांडण्याची संधी या जाहीर नोटीसद्वारे देण्यांत येत आहे.

सदर जाहीर नोटीस मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण मुंबई यांच्या दिनांक २७/३/१७ रोजीच्या आदेशानुसार प्रकाशित करण्यात येत आहे

अर्जदाराचे वकील
ॲड. गौरव अरविंद बांदिवडेकर
म.प्र.न्या., मुंबई.

ठिकाण -मुंबई
दिनांक-१२/०४/२०१७.

मा.प्रबंधक, म.प्र.न्या. मुंबई यांच्या आदेशान्वये

सु.के.जोशी.
प्रबंधक
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण
मुंबई.

MAHARASHTRA ADMINISTRATIVE TRIBUNAL